# पौल व बर्णबा ह्यांनी भिन्न भिन्न संस्कृतीमध्ये काम केले

## देव इतर संस्कृतींच्या लोकांमध्ये मंडळी सुरु करण्यासाठी काही सेवक पाठवतो.

*मुलांना शिकवणाऱ्यांनी T4b हा अभ्यास वाचावा.*

**१. भिन्न संस्कृतीच्या सेवकांना पाढवण्यासाठी प्रार्थना व वचनाच्या द्वारे तुमच्या अंत:करणाची तयारी करा.**

**प्रार्थना:** *''प्रिय प्रभू, तू आमच्या मंडळयांना प्रेषित दिले आहेस. आम्हांला आणि त्यांना इतर संस्कृतीतील लोकांवर प्रेम करण्यास तसेच तुझ्यासाठी त्यांच्यामध्ये कार्य करण्यास शिकव.''*

**पार्श्वभूमि:** *पवित्र शास्त्रामध्ये, यहूदी नसलेल्या लोकांना* **परराष्ट्रीय** *म्हटलेले आहे. जगातील सर्व परराष्ट्रीय लोकांना येशूची सुवार्ता ऐकायला मिळेल असे अभिवचन जुन्या व नव्या अशा दोन्ही करारांमध्ये दिलेले आहे.*

*आम्ही इतर लोकांची संस्कृती समजावून घेनली नाही तर काय घडू शकते ते* **प्रे.कृ.१४:८-१५** *ह्या वचनात वाचा.*



**लुस्त्र येथील लोकांनी पौल व बर्णबा हयांचे देव म्हणून बलिदान करण्याचा प्रयत्न केला.**

- *देवाचे सामर्थ्य दाखवण्यासाठी पौल व बर्णबाने काय केले. (१४:८-१०).*
- *पायाने अधू असणाऱ्या माणसाला कोणी बरे केले अशी लुस्त्रवासी यांची समजूत झाली (११-१२).*
- *पौल व बर्णबाचे काय करण्याची लोकांची इच्छा होती (१३).*
- *पौल व बर्णबाने लोकांना काय समाजावून सांगितले (१४-१५).*

*सर्व लोकांच्या गटांसाठी (राष्ट्रे, वंश अथवा संस्कृती) देवाचा हेतू न बदलणारा आहे हे* **उत्पत्ती १२:१-४** *ह्या वचनांत पाहा. पुढील प्रश्नांच्या पुढे उत्तरे दिली आहेत.*

- *देवाने अब्राहामाला कोठे जाण्यास सांगितले (वचन १)*
- *तेथे गेल्यावर अब्राहाम कोण होणार होता (वचन २)*
- *अब्राहामाशी संबंधित कोणत्या लोकांच्या गटांना आशीर्वाद मिळणार होते (वचन ३)*
- *देवाचे अभिवचन पूर्ण व्हावे म्हणून अब्राहामाने काय केले (वचन ४)*

*अब्राहामाल दिलेले अभिवचन कशा प्रकारे पूर्ण झाले ते* **गलती ३:८-१४** *हया वचनांत पाहा.*

- *भिन्न भिन्न संस्कृतीतील गटांच्या परराष्ट्रीय लोकांसाठी काय करायची देवाची इच्छा होती? (३:८).*
- *देवाकडून आशीर्वाद मिळवण्यासाठी परराष्ट्रीय लोकांनी काय करायचे होते? (९).*
- *लोकांना यहूदी नियमांचे पालन न करताही आशीर्वाद मिळावेत यासाठी ख्रिस्ताने काय केले? (१३)*

- *अब्राहामाला अभिवचनाने दिलेला कोणता आशीर्वाद आज सर्व राष्ट्रांमधील ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांना विश्वासाच्या द्वारे मिळतो? (१४)*

*भिन्न संस्कृतीच्या गटाबरोबर काम करणाऱ्यांचा दृष्टीकोन काय असला पाहिजे ते प्रे.कृ. १०:११-२८ ह्या वचनांत पाहाः*

- *देवाकडून मिळालेल्या दृष्टांतामध्ये पेत्राने काय ऐकले. (१०:११-१६).*
- *आम्हांला भिन्न संस्कृतीच्या गटाबरोबर काम करण्याची संधी मिळते तेव्हा आम्ही कशा प्रकारे कृती करावी अशी पवित्र आत्म्याची इच्छा असते (१८-२३).*
- *आम्ही भिन्न संस्कृतीच्या गटाबरोबर काम करतो तेव्हा आमचा स्वतः कडे पाहण्याचा दृष्टीकोन कसा असावा. (२४-२७)*
- *आमच्या स्वतःच्या संस्कृताला न आवडणाऱ्या संस्कृती गटांबद्दलचा आमचा दृष्टीकोन कसा आसावा. (२८)*

*सांस्कृतिक भिन्नतेची समस्या सोडवण्यासाठी अनेक मंडळ्यांनी एकत्रितपणे कसे काम केले ते* **प्रे.कृ.१५:१-३१** *ह्या वचनात पाहा.*

## २. सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या आठवडयातील कार्यक्रम ठरवा.

**शोध घ्या** *तुमच्या गावात व विभागात राहणारे विविध संस्कृतींचे गट.*

**चर्चा करा** *ख्रिस्ती सेवाकार्य व मंडळ्यांकडून जास्त दुर्लक्ष झालेले गट. हे गट व तुमची संस्कृती ह्यांमध्ये कोणता सारखेपणा व भिन्नता आहे?*

*यापैकी प्रत्येक गटाच्या संस्कृतीची महत्वाची माहिती गोळा कराः*

- *गटामध्ये किती लोक आहेत?*
- *त्यापैकी किती टक्के लोक ख्रिस्ती आहेत?*
- *त्यामध्ये आधीपासूनच किती ख्रिस्ती मंडळ्या आणि लहान गट आहेत?*
- *त्या गटाच्या श्रध्दा व रिवाज तुमच्याशी जुळणाऱ्या आहेत काय? तुमच्यात व त्यांच्यात काय फरक आहे?*

**चर्चा करा व योजना आखा:**

- *तुमच्या मंडळीतील कोणत्या सेवकांना यातील प्रत्येक संस्कृतीच्या गटाकडे सेवेसाठी पाठवता येईल. (भिन्न संस्कृतींमध्ये जाऊन सेवा करण्याची क्षमता व इच्छा कोणाची आहे?)*
- *त्यांना त्यांच्या कामात कोण मार्गदर्शन करील?*
- *त्यांना त्यांच्या कामात पाठबळ कसे पुरवता येईल? पौल करिंथमध्ये तंबू तयार करून स्वतःचा खर्च स्वतःभागवित होता त्याप्रमाणे ह्यापैकी काही सेवकांना करता येईल का (प्रे.कृ. १८:१-३)?*
- *तुमची मंडळी त्यांना केव्हा पाठवणार आहे?*

*मार्गदर्शन करण्याची व मार्गदर्शकांना पौल तिमथी हे साहित्य उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करा.*

## ३. तुमच्या साहकाऱ्यांशी चर्चा करून मंडळीच्या येणाऱ्या उपासना सभेविषयी योजना आखा

*पुढीलपैकी कोणताही कार्यक्रम सध्याच्या गरजा व तुम्हांला असणारा वेळ ह्या गोष्टींना अनुसरण निवडा.*

*तुम्ही वर भाग १ मध्ये काय अभ्यास केला तो अभिनयरूपाने सांगा किंवा बोला, आणि हाच प्रश्न विचारा :*

- *पौल व बर्णबा ह्यांनी लुस्र येथे काम केले तेव्हा काय घडले (प्रे.कृ. १४:८-१४).*
- *सर्व राष्ट्रांच्या संदर्भात देवाने अब्राहामाला काय अभिवचन दिले (उत्पत्ती १२:१-४).*
- *ह्या अभिवचनामुळे आम्हांला देवाचा पवित्र आत्मा कसा मिळतो (गलती ३:८-१४).*

- *यहूदी लोकांना अमान्य असणारा पेत्राचा भिन्न संस्कृती गटांकडे पाहण्याचा दृष्टीकोन देवाने कशा प्रकारे बदलला (प्रे.कृ. १०:११-२८).*

*परराष्ट्रीय लोकांनी त्यांचे तारण होण्यापूर्वी यहूदी रितीरिवाज स्वीकारले पाहिजेत असा विचार यहूदी संस्कृतीच्या ख्रिस्ती लोकांनी का केला आणि त्यांनी ही समस्या कशी सोडवली ते* **प्रे.कृ.१५** *मधून स्पष्ट कराः*

- *अनेक मंडळयांच्या वडील वर्गाने प्रेषितांची भेट घेऊन मतभेदांच्या मुद्यांवर चर्चा केली.*
- *पेत्राने कर्नेल्याच्या गटाला यहूदी लोकांसारखे न होता ही पवित्र आत्मा कसा मिळाला ते सांगितले (१५:८-९).*
- *देवाने परराष्ट्रीयांसाठी कशा प्रकारे अद्‌भुत चमत्कार केले ते पौल व बर्णबाने सांगितले (वचन १२).*
- *परराष्ट्रीयांनी ख्रिस्ती होण्यासाठी आपली संस्कृती बदलण्याची आवश्यकता नाही असा निष्कर्ष याकोबाने काढला (वचन १९).*

*वेगळी संस्कृती असलेल्या गटाबरोबर नुकतेच काम करून आलेल्या कोणालाही देव काय कार्य करीत आहे ते सांगण्यास सांगा.*

*मुलांना त्यांनी तयार केलेला कार्यक्रम सादर करायला सांगा.*

**प्रभुभोजनाची** *ओळख करून देण्यासाठी यशया ५३ हा अध्याय वाचा.*

*इतर संस्कृतीच्या गटांचे तारण व्हावे आणि त्यांना सुवार्ता सांगणारे सेवक याकरीता मध्यस्थीची प्रार्थना करण्यासाठी विश्वासणाऱ्यांचे* **लहान गट** *तयार करा.*

*एकत्र पाठ करा. प्रकटीकरण ७:९.*

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net